

# गोरखगड ते सिद्धगड

पंकज घारे

ई साहित्य प्रतिष्ठान

ट्रेकिंगगिरी

पुस्तकाचे नांव गोरखगड ते सिद्धगड

प्रकार : ट्रेकिंगिरी

लेखक : पंकज प्रतिभा-प्रकाश घारे

9819663630

mr_ghare@yahoo.co.in

फ़ोटो : पंकज घारे

ई पुस्तक निर्मिती: लास्ट बेंच डिझाईन

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

काही फ़ोटो गुगलवरून साभार

*e Sahity Pratishthan*
*eleventh floor*
*eternity, G1102*
*eastern express highway*
*Thane. 400604*
*Ph : 9869674820*

*esahity @gmail.com*
*http://www.facebook.com/PahilePaool*
*www.esahity.com*
*www.ednyaneshwari.com*
*www.marathiriyasat.com*
*http://etyarth.blogspot.in/*
*http://esahityapratishthan.blogspot.in/*
*www.marathiriyasat.com*

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध

आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखककाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे  पुनर्मुद्रण किंवा रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

©esahity Pratishthan® 2013

इंटरनेट युगात

मराठीचा झेंडा

बुलंद करायच्या जिद्दीने मैदानात उतरलेल्या

ई साहित्य प्रतिष्ठानला

सन्मानपूर्वक समर्पित

-- पंकज प्रतिभा-प्रकाश घारे



# गोरखगड..... हा खेळ पायऱ्यांचा



तिथीप्रमाणे शिवजयंतीचा दिवस होता. शिवजयंती उत्सव गणेशोत्सवाप्रमाणे साजरा होत नाही. पंढरीची वारी निघते, साईंची पालखी निघते, त्याप्रमाणे शिवजयंती सार्वजनिक स्वरुपाने साजरी करण्यासाठी हे पाऊल उचलावेसे वाटले. मग शिवजयंती कितीही वेळा येवो. ट्रेकर्ससाठी पर्वणीच ठरेल.

आई–वडिलांना त्रास न देता, पहाटेच प्रवास सुरु करायचा असेल तर मित्राच्या घरी आदल्या रात्री राहायला जाणे हा योजनेतला पहिला टप्पा. सकाळी ५:३० वाजता ऐरोलीहून बाईक घेऊन मी आणि विशाल सूर्यवंशी बाहेर पडलो. वाटेतले स्पीडब्रेकर खऱ्या अर्थाने जागे करत होते. ५:५१ ला लोकलचा प्रवास सुरु झाला आणि कल्याणला ६:३० ला संपला. विनायक झांब्रे कल्याण बस आगारात



आमची वाट पाहत होता. व्यवसायाने तिघेही इंजिनीअर.... डोक्याने ट्रेकिंगचे वेडे.

कल्याणहून मुरबाडला जाणाऱ्या बसेसची वारंवारिता बऱ्यापैकी आहे. आधीच थांबलेल्या बसमधून प्रवास सुरु झाला. एक तास झोपल्यानंतर मुरबाड बसस्थानकावर चहा घेतला. म्हापसा जाणारी बस बऱ्याच वेळाने म्हणजे ९:१५ ला आहे हे कळल्यावर जीपने जायचे ठरले. सोबतच्या गुंडाळलेल्या मॅटमुळे माझ्या सीटवर मी आणि विनायक दोघेच बसू शकलो. पण समोर चार काटकळ बायका दाटीवाटीने बसलेल्या. 'म्हापसा' येथे गाडी थांबली. 'देहरी' जाण्याआधी पोटपूजा म्हणून दोन-दोन वडापाव कोंबले. मॅगी बनवण्यासाठी लागणारे भांडे, छोटा टोप आणायचे विनायक विसरला म्हणून तो 'स्टील'चा घ्यावा की 'जर्मन'चा (ॲल्युमिनिअमचा) हे विचारण्यासाठी आईला फोन केला. उत्तर..... जर्मन.



जीपने देहरी गावात आलो आणि ‘गोरखगड’ व ‘सिद्‌धगडा’चे शिखरदर्शन झाले. एका दुकानात तिघांच्या नावांची नोंद वहीत केली. गडावर गेलेली व्यक्ती पुन्हा खाली आली की नाही याची नोंद होण्यासाठी ही पद्‌धत सर्वत्र ट्रेकिंगच्या स्थळी असावी. शिवाय येणाऱ्या लोकांची वारंवारता लक्षात घेऊन कदाचित ‘बसेस’सुद्‌धा संख्येने वाढतील व गावांनाही फायदा होईल असे आमचे एकमत झाले.

पायी प्रवासास सुरुवात करताक्षणी रंगीत पक्ष्यांनी आमचे जोरदार स्वागत केले.... आणि त्यांनी आमच्या बॅगमधून दुर्बिण बाहेर काढली. पक्षी न्याहाळत न्याहाळत प्रवास सुरु झाला. दोन दिवस आधी भैरवगडावर ‘होळी’ व ‘रंगपंचमी’ ट्रेकिंग क रून साजरी केल्याने चालण्याचा वेग थोडा मंदावलेला. वाळलेल्या पानांमधून चालताना सळसळ आवाज केल्याशिवाय चालता येत नव्हते. नेहमीप्रमाणे सुरुवातीची



दमछाक सुरु झाली. आणि थोड्याच वेळात बॅग सावरत, मुळांना पकडत, दगडांचा आधार घेत चढाईला सुरुवात केली. अगदी योग्य जागी केशरी रंगाने बाण काढले होते. त्या ‘दगडांचे’, रंगाचे आणि ‘भटक्यां’चे आभार मानत निघालो. ऊन वाढत चाललं होतं, पण जंगलात तितकसं जाणवत नव्हतं. गडाच्या दिशेने न जाता गडाच्या डाव्या बाजूने मार्गक्रमण....

दम लागला की क्रमाक्रमाने(!) तिघांना एकेक पक्षी एकेकाला दिसत होता आणि बॅगेतलं पाण्याचं वजन कमी (?) होत होतं. वेगवेगळ्या वळणांवर वेगवेगळ्या गडांची आठवण आणि अनुभव कथन करताकरता जंगलातली वाट संपली आणि माकडे पळताना दिसली. कोणालातरी वर्दी देण्यासाठी खूप घाईने ते निघाले. आता आमच्यासोबत आणलेल्या बॅगेतल्या पदार्थाची काळजी वाटू लागली. थोड्याच वेळात भग्न अवस्थेतले महादेवाचे मंदिर लागले. मंदिराच्या बाजूला बसून बॅगेतून आणलेल्या खारकांच्या महाप्रसादाचा लाभ घेतला व जलप्राशन केले. इथून पुढे कठीण वाट होती. हे गड बघूनच



कळत होते. माथा पाहण्यासाठी वर पाहताना टी–शर्टच्या कॉलरच्या घड्या पडत होत्या.

पायऱ्यांप्रमाणेच, पाठीवरची बॅग, जिला मॅट बांधली होती, तिच्यामुळेही तोल जात होताच. कधी पद्धतशीरपणे माणसासारखं चालणं, पायऱ्या चढणं संपलं कळालंच नाही. आधी गडाच्या एक–एक दगडाला आणि नंतर पूर्ण गडाला 'हात टेकले' कोपरापासून हात जोडता येत नव्हते, तरीही ध्येय अजून खूप उंचावर होते. एकेका पायरीला हाताने पकडत चढणे चालूच होते. क्रमाने चालणाऱ्या तिघांच्या मधल्या जागेत, डोक्यापासून वर, पायाखाली आणि समोर पायऱ्याच..... नागमोडी वळणाच्या पायऱ्यांवर उभे राहून मागे पाहिल्यास केवळ दोन ते तीनच पायऱ्या आणि त्यापुढे दरी दिसू लागली. भगव्या रंगाचे प्रवेशद्वार दिसू लागल्यावर वेग वाढला आणि दाराच्या सावलीत थोडे विसावलो. इथूनही मोजक्याच पायऱ्या दिसत होत्या आणि हरवलेल्या वाटा सावलीसाठी भटकत होत्या.

पायऱ्या चढून वर आलो आणि एका गुहेत बॅगा ठेवल्या आणि पुन्हा काहीशा तशाच पायऱ्यांचा खेळ. पायऱ्यांच्या कोपऱ्यात



बनवलेल्या खोबणी, चढताना फार मदत करत होत्या. त्यामुळे चढणं थोडं कमी कठीण झालं. या पायऱ्या संपल्यानंतर उजवीकडून व्यवस्थित चालता येईल अशा रस्त्याने चालू लागलो. वीस–पंचवीस जणांची रहाण्याची व्यवस्थित सोय होईल अशी गुहा. थोड्याच अंतरावर दोर बांधलेली बादली घेऊन एका टाक्यातले पाणी काढायचे ठरले. पाणी काळसर आणि कचरा असलेले दिसले. त्यामुळे डोळ्यांवरचा काळा गॉगल काढला आणि तो स्वच्छ केला.

जग पाहताना असे अनेक गॉगल काढून ठेवणे ही गरज आहे.



थंडगार पाणी पिऊन, चेहरा धुऊन पुढे निघालो. गुहेला वळसा घातला. इथून वर जाताना हातात पाण्याची बाटली धरणे जमले नाही. सुरुवातीला थोडं प्रस्तरारोहण (रॉक क्लायंबिंग) करावं लागलं. इथून पुन्हा उतरताही येतं हे तपासून पाहिलं. पायऱ्या संपल्या आणि गड सर केला. ‘शिवाजी महाराज की जय’ च्या जयघोषानंतर शिवमंदिराजवळ आलो. केवळ एकाने एकदा घंटानाद करून पूर्ण गडावरचे

वातावरण प्रसन्न झाले आणि थकवा?...... जणू आलाच नाही. गडावर फारशी जागा नाही. इथून दूरवरचा परिसर न्याहाळून झाला. सिद्‌धगड आम्हाला खुणवत होता. मच्छिंद्रगड, जीवधन हे गडसुद्‌धा दिसत होते.

प्रत्येक पायरी उतरताना शांतपणे विचार, थोडे धाडस, थोडी सावधानता बाळगावी लागत होती. कोणतीही पायरी शेवटची ठरू शकली असती. अलगद–अलगद पाय ठेवत पायऱ्या उतरताना, हाताच्या तळव्यांना चटके आणि पायऱ्यांचा खडबडीतपणा असह्य करत होता. पण याच कारणामुळे उतरण्याचा वेगही वाढू लागला. उतरताना पायरीवर कोरलेला शिलालेख फक्त ‘बघितला’. पुन्हा मोठ्या गुहेपाशी येऊन ‘त्या’ (गॉगलमधून पाहिलेल्या) स्वच्छ आणि निर्मळ पाण्याच्या टाक्यात बादली बुडवून पाणी काढले. बाटल्यांमध्ये आणि पोटात पाणी ओतले. छोट्या गुहेतून बॅग घेऊन उरलेल्या पायऱ्या उतरू लागलो. आता बॅगही खाली ढकलू लागली. शिवमंदिरापाशी येऊन थांबलो. शिवजयंती साजरी झाली, ही सुद्‌धा पद्‌धत असावी असे जाहीर करून सिद्‌धगडाकडे मोर्चा वळवला.





# गोरखगड ते.......?.....?.....
# सिद्धगड.



गोरखगडाच्या माथ्यावरून आणि उतरता उतरता सिद्धगडाकडे जाणारी वाट, तिची दिशा, लाल रंगाचे झाड, चौक आणि तिठा ध्यानात ठेवला होता. त्यानुसार तिठ्यापर्यंत आलो. उन्हाळा सोडून इतर ऋतूत हा रस्ता दिसेल असे वाटत नाही. तिठ्यावरून मागे फिरून वरून दिसलेल्या रस्त्याने थोडे मागे आलो. ठरल्याप्रमाणे थोडा वेळ स्पष्ट दिसणाऱ्या रस्त्याने चालू लागलो, पण लाल रंगाच्या झाडाकडे जाणारा रस्ता आणि थोड्या वेळाने लाल रंगाचे झाडही सापडत नव्हते. गोरखगड ते सिद्धगड मधील पर्वताच्या बाजूने, पायवाटेवरून चालू लागलो..... आणि ठरवलेल्या रस्त्याच्या अगदी दूर जाऊ लागलो आहोत असे कळाले म्हणून आता डोंगराच्या



कडेने जाण्याआधी ठरवलेल्या दिशेने निघालो.

..... आणि शंकेची पाल चुकचुकली.... वाट चुकलो कदाचित.... तीव्र उतार, त्यावर ठिसूळ माती, पालापाचोळा, घसरगुंडीची वाट पाहणारे छोटे–मोठे दगड, मोक्याच्या (नको त्या) ठिकाणी वाढलेले परंतु सुकलेले गवत... दोन झाडांमध्ये उतारावरचे दहा फ्ट अंतर.... त्यामधल्या गवताच्या काडीचा आधार घेतल्यास ती काडी हातात पार्सल म्हणून मिळत होती. ठरवलेल्या दिशेन जायचे म्हटल्यास कशाचाही आधार मिळणार नव्हता. शेवटी त्याच उतारावर जिथे सलग दहा–दहा फ्टांवर झाडे आहेत त्यांनाच एकेक टप्पा म्हणत जिथून पडण्याची शक्यता जास्त होती असा किनारा गाठावा लागला. तरी एक जण सावधपणे चालू शकेल अशा रस्त्याने किनाऱ्यावरच ठरवलेल्या दिशेच्या विरुद्ध चालू लागलो. इथून किमान उतार तरी कमी होत होता.

पायवाट उतरल्याक्षणी आधी मागे वळून पाहिले आणि नंतर एकमेकांच्या तोंडाकडे..... काहीतरी विशेष केल्याचे समाधान तिघांच्याही चेहऱ्यावर होते. डोंगराच्या मधोमध उंचावर आधार देणारे



'कांडळा'चे झाड तितकेच चकाकत होते. त्या झाडामागच्या ज्या झाडांनी हात दिला ते इथून एकमेकांच्या खूप जवळ दिसत होते. कदाचित हीच गोष्ट गोरखगडावरून निरीक्षण करताना ध्यानात आली नाही की जरी दोन झाडांमधील अंतर दुरून कमी दिसले तरी त्या जागेचा उतार लक्षात घेणे गरजेचे आहे. नवा मार्ग शोधण्याऐवजी गोरखगड ते सिद्धगडमधल्या डोंगराच्या कडेकडेने गेल्यास उत्तम. दिवसातला वेळ वाचवण्यासाठी वापरलेला शॉर्टकट आयुष्यातला बराचसा वेळ वाया घालवू शकतो किंवा वेगळ्याच रस्त्याचा शॉर्टकट दाखवू शकतो.

वाटेत एका गावकऱ्याला 'सिद्धगडवाडी' विचारले असता त्याने 'पढना आता है?' असे हिंदीत विचारले. याला आमचे कपडे आणि अवतार कारणीभूत होता. आम्ही मराठीत उत्तर दिले. सांगितलेल्या खुणा लक्षात ठेवून 'धन्यवाद' ही म्हटले.

नजर वर ठेवत रस्त्याचे किंवा जागेचे नाव शोधायची शहरी सवय असल्याने जमिनीवर पडलेल्या खडकावर 'शिंदेपाडा'



लिहिलेले पाहून नुसते वाचता येणे उपयोगाचे नाही तर थोडे डोकेही वापरावे लागते हे कळले. सवयीचे गुलाम असल्यासारखे वाटले.

बोरिंगचे पाणी पिऊन ताजेतवाने झालो. भारद्वाज पक्ष्याची सरडा पकडण्याची धडपड पाहून झाली. एका घरात चहासाठी विचारल्यावर कोरा चहा मिळेल असे 'शिंदे'नी सांगितले...... पण आम्ही चहा न घेताच निघालो.... वाटेत एका घरात सिद्धगडवाडीबद्दल विचारल्यावर सोबत एक वाटाड्या दिला. तिथेच चहा मागितल्यावर थोड्या वेळात चहा आला..... पुन्हा कोरा चहा.....?.....!.....?...... पण चहा अप्रतिम होता..... सवयीचे गुलाम असल्याची पुन्हा लाज वाटली, पण ट्रेकिंग करतानाचे प्रयोग अजून बाकी होते. सोबत आणलेल्या दुधाच्या क्रीमचे बिस्किट कोऱ्या चहाबरोबर खाताना टिकलेली ग्रामीण 'संस्कृती' आणि वाढणारा शहरी 'थाट' याचा सुरेख संगम जाणवला. शेजारचे पपईचे झाड 'पपईचे'च का? असा प्रश्न निर्लज्जपणे विचारला आणि "खाणार का?" या प्रेमळ प्रश्नाला नाटकी 'हो' उत्तर दिले.  ज्याप्रमाणे विजेचा बल्ब अलगद फिरवून काढतात तशी पिकलेली पपई काढली.

पपईवर ताव मारला खरा, झाडाला काजू अजून लागले नव्हते आणि शेवग्याच्या शेंगाही फार कमी होत्या.
हावरटपणा बाजूला ठेवून सिद्धगडासाठी सिद्ध झालो. सर्वांचा निरोप घेऊन चालायला सुरुवात केली.





# सिद्धगड..... परीक्षागड



शिंदेपाडापासून चालायला सुरुवात झाली. पपईच्या झाडाकडे खट्याळपणे पाहून झाले. पुन्हा एकदा पालापाचोळा, खडक सोबतीला.... अधून मधून आपोआप तयार झालेल्या पायऱ्या, वळणाकृती चढण... गड तर खूप लांब होताच... आता नुसते गडाच्या पायथ्याशी पोहोचायचे होते.... जसे ठरवले होते तसे.

मागे वळून पाहताना गोरखगड आणि तिथून हिंमतीने उतरलेला रस्ता पाहून गर्वही वाटत होता आणि ट्रेकिंगच्या वेडावर हसूही येत होते. आणि शिवजयंती साजरी केल्याचे समाधानही... पण अजून एक सुळका 'सिद्धाची लिंगी' पाहिल्यावर गोरखगड काही केल्या डोक्यातून बाहेर येत नाही असे वाटले. दोघांनाही दूर सारत चालत राहिलो. वाटेत सुकलेल्या सिताफळांचे झाड, कांडळाचे झाड, सुकलेला मोठा ओढा पार करत जंगलातून चालत होतो. आता पाण्याच्या बाटलीत ग्लुकॉन–डी मिसळली जात होती.



चालता–चालता समोर सिद्‌धगडाचे प्रवेशद्वार लागले व क्षणभर विसावलो. नारीमाता मंदिरासमोरून जवळपास सपाट रस्त्याने कालच्या तुलनेने ‘झपाझप’ चालत सिद्‌धगडवाडीला येऊन थांबलो. जवळच एका घरातून कळशीभर पाणी, तांब्या, एक घोंगडी, एक चादर यांची व्यवस्था झाली. घराशेजारी कोंबड्या (आणि कोंबडेही) दिसल्याने अंडी मिळतील का असे एका खुराड्यात... माफ करा... घरात विचारले. सर्वचजण टीव्हीवर ‘एका लग्नाची दुसरी गोष्ट’ पाहत असल्याने क्षणाचाही विलंब न लावता व मानही न हलवता “नाही” हे उत्तर मिळाले. राहण्यासाठी मिळालेली शाळा ही शाळा नसून तरुणांनी स्वतःसाठी रुपांतरीत केलेली व्यायामशाळा, तसेच संगीताची शाळा, तसेच एक चूल असलेली खोली होती. भिंतीवर एका शरीरसौष्ठवपटूचा फोटो आणि अनेक ठिकाणी भिंतीवर आरशांच्या तुकड्यांचे प्रदर्शन.

शाळेच्या व्हरांड्यात मॅटची गुंडाळी उघडली. जॅमचा डबा–लोणच्याचा डबा – अमूल लोणीचा बॉक्स – ब्रेडचा बॉक्स.... उघडला, ब्रेडच्या दोन्ही बाजूला वेगवेगळ्या पदार्थांचे थर लागले...



आणि इंजिनीअर्सनी नवा अविष्कार घडवला.... नवा शोध लागला आणि काळाच्या आड गेलाही.... पण भूक शमली नाही जोपर्यंत गावकऱ्यांनी तीन दिवस आधी पेटवलेली होळी पेटलेलीच दिसत होती. भांडे आणि मॅगी बाहेर पडले. होळीपासून आग 'उसनी' घेऊन व दगडांची चूल बनवून 'वीस' मिनिटात मॅगी तयार... आणि दोन मिनिटांत फस्त.... थोड्या वेळाने आधीच उगवलेला चंद्र एका डोंगरामुळे बराच उशिराने वर आला आणि आम्ही मावळे मावळलो.

सकाळी ७.०० वाजता उठून ७.३० पर्यंत तयार झालो. शेजारच्या घरात चहा पिऊन झाल्यावर बाटलीत पाणी भरण्यासाठी विहिरीच्या दिशेने निघालो. विहिर कुठे आहे, हे नुसतं विचारल्यावर चार मुलांनी विहिरीपर्यंत आणून सोडले... थोड्या वेळाने गड चढायला आणि पाचच मिनिटांत उतरायला सुरुवात केली.... कारण सुरुवातीलाच रस्ता समजत नव्हता. पुन्हा मागे फिरून त्याच मलांना गडाचा रस्ता दाखवण्यास सांगितले आणि ट्रेक सुरु झाला चुणचुणीत, चपळ मुलांसोबत स्वतःचे बालपण धावत आले. गोरखगडचा ट्रेक, गोरखगड ते सिद्धगडवाडी हा नवीन वाटेने प्रवास यामुळे पाय दुखू



लागले होते. जंगलातही सुरुवातीची वळणे कधी गडाजवळ तर कधी लांब नेत होती, पण उंची मात्र निश्चितपणे गाठली जात होती. सुकलेली पानं आणि गवत हे नेहमीचंच. जसं जंगल संपलं तसा मुलांनी निरोप घेतला आणि मी, विनायक व विशाल चढू लागलो. अगदी कडेकडेने जाताना प्रवेशद्वार किंवा पायऱ्या याबद्दल माहिती नव्हती. इंटरनेटवर मिळालेली माहिती बरोबर असली तरी चुकल्याशिवाय तो रस्ता चुकीचा आहे हे कळत नव्हते. मध्येच पायऱ्या दिसल्या. त्या चढून गेल्यावर गुहेला लागूनच झोपडीसदृश जागेत थोडा वेळ घालवला. त्यापुढे थोडं चढून गेल्यावर थंड पाण्याचं टाकं होतं. तिथून यथेच्छ पाणी पिऊन गेल्यावर रस्ता थांबला आणि आम्हीही मागे वळलो.

इथून पुढे चढताना गडाला मारलेली मिठी सोडवत नव्हती. डोंगराला पडलेल्या खाचांवर कधी पायांची फक्त बोटं ठेवण्यास जागा ....तर कधी एका हाताने खाचेला पकडून त्या खालच्या खाचेत पाऊल आडवे ठेवून, लगेच पुढच्या खाचेवर पाय.... पायवाटेलाही दरीच्या दिशेने, घसरायला लावणारा उतार.... याच तिरक्या पायवाटेला



तोडणारा छोटासा झरा ओलांडताना छातीजवळ काटेरी झुडूप... या सर्वांना आणि स्वतःला सांभाळत गडाची उंची सर करावी लागत होती. खाचांवर जमा झालेले दगड बाजूला सारले की त्यांच्या पडण्याचा आवाज बऱ्याच वेळेपर्यंत कानावर पडत राहायचा. उभं राहायला जागा मिळाली की मागे वळून पाहिल्यास 'सिद्धाची लिंगी' व गोरखगड एका कुल्फोच्या आकाराप्रमाणे, तर जसजसे उंच जावे तसतशी ही कुल्फो आकाराने छोटी होत होती. कालच्या गोरखगडाच्या अनुभवानुसार हे दगड उतरताना खूप गरम जाणवतील यात शंकाच नव्हती. गोरखगडावर किमान पायऱ्या तरी साथीला होत्या, पण सिद्धगडावर दोर न वापरता, प्रस्तरारोहण केल्यासारखाच अनुभव...

गडमाथ्यावर पोहोचल्याबरोबर शंकराची पिंड आणि नंदीच्या मूर्तीचे दर्शन झाले. तेथेच बॅग फकून माचीच्या दिशने चालायला सुरुवात केली. बऱ्याच वेळाने इतका सपाट रस्ता चालायला मिळत होता. उत्साहाने माचीच्या टोकापर्यंत जाता जाता वाटेत पाण्याच्या पाच–सहा टाक्या. पहिल्या टाक्यापासून शेवटच्या टाकीपर्यंत पाणी

तुलनेने स्वच्छ दिसत होते. आधी दिसलेल्या वाटेवरून टोकावर आल्यानंतर इतक्या उंचीवर असलेला, बांधलेला बुरुज आणि प्रवेशद्वार पाहून आश्चर्य वाटतेच.

इथून भीमाशंकरची रांग, 'पदर'गड, गोरखगड पाहून मागे फिरलो. परतताना टाक्यांमधले पाणी बाटलीत भरून घेतले. उतरताना दगडांचे चटके हाताने सहन करता करता हातावर हे पाणी ओतण्यासाठो वापरता येणार होते... पिण्यासाठी नाही. गडाच्या दुसऱ्या टोकावरून खाली पाहिल्यास गावातले शेत चटईप्रमाणे, शेतातील विहिर कपबशीप्रमाणे, तर भोवतालची चरणारी गुरे मुंग्यांप्रमाणे दिसत होती.

गड उतरताना पराकोटीची काळजी घेत निघालो. पाय ठेवलेली जागा सुरक्षित आहे याची खात्री केल्याशिवाय पुढचे पाऊल उचलत नव्हतो. योग्य वेळी बसून, योग्य वेळी गडाला पाठ दाखवत तर कधी बॅगेमुळे जाऊ शकणारा तोल सांभाळण्यासाठी तिरकस होऊन उतरावे लागले. हातांवर पाणी ओतण्यासाठी होणारी हालचाल टाळली... खरंतर हालचाल करायला मिळाली नाही. हा कठीण भाग उतरून झाला आणि हायसे वाटले.

आतापर्यंत केलेल्या काही सोप्या गडांवर 'ट्रेकिंग केली' असे म्हणणे म्हणजे ट्रेकिंगचा अपमान आहे असे सिद्‌धगड चढताना व उतरताना जाणवले. सिद्‌धगडची स्तुती करत करत माहीत झालेल्या रस्त्यावरून जंगलातून उतरु लागलो. उतरण्यास एक दीड तास लागतो. सिद्‌धगडवाडी गावापासून 'उचले' गावापर्यंत बैलगाडीच्या मार्गाने यावे. तिथून पुन्हा जीप आणि नंतर मुरबाड स्थानक. ट्रेकिंगची परीक्षा घेणारा सिद्‌धगड खरोखर प्रत्येकाची सिद्‌धता सिद्‌ध करायला लावतो.







**पंकज घारे** हा गडकिल्यांचं आणि डोंगरदऱ्यांचं वेड घेऊन जन्माला आलेला एक मुलगा. पण या वेडाबरोबरच एक शहाणपण त्याने आणले, ते म्हणजे प्रवासाचे लिखाण करून ठेवण्याचा छंद. बहुधा हा त्याच्या VJTI आणि SPCE मधील इंजिनिअरिंगच्या शिक्षणाचा परिणाम असेल. त्यामुळे झाले काय की त्याच्या पाऊलखुणांचा उपयोग करून इतरांना (सुखकर नसला तरी) सुकर प्रवास करता येतो, आणि ज्यांच्या मनात उमेद आहे, पण पायांत बळ नाही अशांना त्याच्या ट्रेकचा मजा चहाच्या घुटक्याबरोबर घेता येतो. गेल्या दहा वर्षांत किमान चाळीसेक ट्रेक केलेल्या पंकजने आजवर या बहुतेक ट्रेक्सचे वर्णन लिहून ठेवले आहे. त्याचे वर्णन हे सरकारी नोंदींसारखे रटाळ आणि कोरडे नसते. त्यामुळे निव्वळ

मनोरंजन म्हणूनही ते वाचता येते. त्यामुळे आजवर लोकसत्ताने त्याच्या अनेक लेखांना प्रसिद्धी दिली आहे. संवेदना प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या त्याच्या हिमालयन (सरपास) ट्रेकबद्दलच्या “पहिले पाऊल” या पुस्तकाची पहिली आवृत्ती केवळ चार आठवड्यांत संपलीही. त्यामुळे आता त्याच्या दुसऱ्या आवृत्तीची आणि तयारी सुरू झालीये. त्यातून त्याचं एकांकिका लेखन तर चालू आहेच. हे सगळं नोकरी सांभाळून(?). या मधल्या काळात त्याच्या ईपुस्तकांची सिरीजच सुरू होत आहे... ट्रेकिंगिरी.

आता एक वाचकांना विनंती. पंकजच्या या पुस्तकाबद्दलचं तुमचं प्रांजळ मत मिळालं तर त्याचं पुढचं लिखाण अधिकाधिक चांगलं होत जाईल. मग ती शाबासकीची थाप असो वा सुधारणेच्या सूचना; पण पुस्तक वाचून तुम्ही काहीच प्रतिक्रिया न देणं मात्र त्याला नाऊमेद करेल.

तुमच्या प्रतिक्रिया फ़ोन किंवा ई मेलने कळवाच.

http://www.facebook.com/PahilePaool

**9819663630**

**mr_ghare@yahoo.co.in**



इंटरनेटशी संबंध असणाऱ्या मराठी माणसाला ई साहित्य प्रतिष्ठानबद्दल माहिती होतेच. इंटरनेटच्या युगात नेटचा वापर करून मराठी साहित्य आणि मराठी बाणा यांचं संवर्धन करण्यासाठी काम करणाऱ्या व्यक्ती आणि ग्रुप्सबरोबरोबर ई साहित्य प्रतिष्ठान एकत्र काम करून निरनिराळी ई पुस्तके आणि ई नियतकालिके बनवीत असते आणि जवळपास दीड लाख लोकांपर्यंत ई मेलद्वारे त्याचे वितरण करते. त्याला पुढे पाय फ़ुटत रहातात आणि ही पुस्तके (वाचकांच्या आवडीनुसार) पुढे वर्ष वर्ष सर्क्युलेट होत रहातात.

मराठी भाषा आणि मराठी बाणा निरनिराळया अंगांनी व्यक्त होत असतात. कविता, कथा, कादंबऱ्या यांसारखेच प्रवासवर्णन हे एक साहित्याचे अंग आहे. हे पुस्तक कसे वाटले ते नक्की कळवा. तुमच्या फ़ीडबॅकवरच लेखकांचे पुढचे लिखाण अवलंबून असते. त्यामुळे आपण या उद्याच्या साहित्यिकांना आज

आपले दोन शब्दांचे प्रोत्साहन तर पाठवाच. हे पुस्तक आवडले तर आपल्या मित्रांना फ़ॉरवर्ड करा. मराठी भाषेवर प्रेम असणाऱ्या लोकांचे ई मेल पत्ते आमच्याकडे पाठवा.

आम्ही पुस्तके विकत नाही. वार्षिक वर्गणीही नाही. मात्र आम्हाला बारा किंवा त्याहून अधिक ई मेल पत्ते पाठवणाऱ्या व्यक्तींना आम्ही आमचे पाठीराखे म्हणून अधिक महत्त्व देतो. प्रत्येक पुस्तकाची पहिली मेल त्यांना जाते. पुढील योजना त्यांच्याशी शेअर करतो. त्यांच्या सूचनांना अधिक वजन देतो. तुम्ही दिलेल्या ई मेल्सचा वापर मराठी साहित्य सोडून इतर कशाहीसाठी केला जात नाही.

बारा mail ID पाठवा. आमचे पाठीराखे व्हा. नवीन लेखकांचे पाठीराखे व्हा. मराठी तुमच्या पुढल्या पिढ्यांची पाठराखण करील.

esahity@gmail.com